| MHND140001412026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९/२०२६**<br>**पंचकला व इतर विरुध्द निरंक** |
|---|---|

## निशाणी क्र.१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ पंचकला विश्वनाथ यरमुने व इतर ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस दाखल मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, मयत **कुलदीप विश्वनाथ यरमुने** यांची अर्जदार क्र.१ ही आई, अर्जदार क्र.२ ही पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ ही मुले असुन मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांचा **दि.०९/०५/२०२४** रोजी मृत्यू झाला आहे.

०३. अर्जदारांनी सदरील अर्ज हा शासकीय व निमशासकीय कामासाठी मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०४. मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांच्या निधनानंतर त्यांना अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

०५. अर्जदार क्र.१ ते ४ हेच मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांचे वारस असल्याचे सिध्द करणेकरिता खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | दैनिक दलीतवाणी दि.१०/०२/२०२६ रोजीचे जाहिर प्रगटन. | निशाणी क्र.११. |
| ०२. | सदस्य, नगरपरिषद कार्यालय, देगलूर, ता.देगलुर, जि.नांदेड यांनी दिलेले वारसा प्रमाणपत्र. | निशाणी क्र.१४ |
| ०३. | मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. | निशाणी क्र.१३ |
| ०४. | अर्जदार क्र.१ ते ४ यांचे आधारकार्डाची पडताळणी प्रत. | निशाणी क्र.१५ ते १८ |
| ०५. | अर्जदार क्र.२ कांचन कुलदीप यरमुने यांचे पुराव्याचे शपथपत्र | निशाणी क्र.१२ |

०६. अर्जदारांतर्फ पुरावा संपल्याची पुरसिस निशाणी क्र.१९ वर दाखल करण्यात आली. अर्जदारांचे विधीज्ञांचा युक्तीवाद विस्तृतपणे ऐकण्यात आला.

०७. निशाणी क्र.१ वरील आदेशाद्वारे सर्व सामान्यांकडुन हरकत आक्षेप नोंदविण्याकरीता जाहिर प्रगटन "दैनिक दलीतवाणी" या वृत्तपत्राच्या दि.१०/०२/२०२६ रोजीच्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. तसेच, घरावर डकवुन संबंधीतांचे आक्षेप बोलविणारी सुचना बजावण्यात आली. विहीत मुदतीत अर्जदार क्र.१ ते ४ यांनी दाखल केलेला सदरच्या अर्जास कोणीही आक्षेप नोंदविला नाही. सबब प्रस्तुत अर्ज निर्वीवादीत राहिला.

०८. साक्षीदार यांनी त्यांच्या पुराव्यात अर्जातील विवादीत कथनांचा हुबेहुब उहापोह केला व पुराव्यामध्ये मयताशी नाते संबंध आणि अर्जदारांचे वारस असल्याचा दर्जा प्रकर्षाने उदघृत केला आहे. मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांच्या मृत्यूची सिध्दता मृत्यूप्रमाणपत्र

निशाणी क्र. १३ द्वारे सिध्द होत आहे. यावरुन मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांना इतर कोणतेही वारस नाहीत हे स्पष्ट होत आहे.

०९. वरिल सर्व बाबींचा विचार करता खंडणाअभावी दाखल पुराव्यावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण अभिलेखावर उपलब्ध नाही. उपरोक्त परिस्थीतीनुसार व कायद्यातील तरतुदींची पाहणी करता अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने यांचे वारस म्हणुन वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहेत. त्यामुळे परिणामतः अर्जदार क्र.१ ते ४ हे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता पात्र ठरलेले आहेत. या परिस्थितीस अनुसरुन निम्नलिखित आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| ०२. | अर्जदार **क्र.१ पंचकला विश्वनाथ यरमुने, २. कांचन कुलदीप यरमुने, ३. विराज कुलदीप यरमुने व ४. अभिराज कुलदीप यरमुने** यांना **मयत कुलदीप विश्वनाथ यरमुने** यांचे वारस म्हणून घोषीत करण्यात येत आहे. |
| ०३. | अर्जदार क्र.१ ते ४ यांचे नावे बॉम्बे रेग्युलेशनचे पुरवणी ब मधील विहीत नमुन्यातील वारस प्रमाणपत्र नियमाप्रमाणे योग्य ती कोर्ट फिस स्विकारुन देण्यात यावे. |

DEV RAGHAVENDRA NARHARRAO

Digitally signed by DEV RAGHAVENDRA NARHARRAO
Date: 2026.04.13 16:56:15 +0530

दि.१३/०४/२०२६

**(राघवेंद्र एन. देव)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
देगलुर, जि.नांदेड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Ganesh V. Kulkarni |
| Name of Court | Shri. Raghavendra N.Dev, C.J.J.D. and J.M.F.C., Degloor |
| Date of Dictation | 13/04/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 13/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | 13/04/2026 |